महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४७ वे | दिनांक : ०३/०९/२०२६ | वार : गुरूवार

## कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांचे विधान: सीतेचे चारित्र्य रामापेक्षा मोठे



**बंगळुरू :** कर्नाटकचे मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी बुधवारी सांगितले की, रामायणात सीतेचे चारित्र्य भगवान रामापेक्षा खूप मोठे आहे.

ते बेंगळुरूमध्ये उबंटू कन्सोर्टियम ऑफ वुमन एंटरप्रेन्योर्स असोसिएशनने आयोजित केलेल्या 'टुगेदर वी ग्रो इंटरनॅशनल वुमन एंटरप्रेन्योरशिप डे' च्या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन केल्यानंतर बोलत होते.

शिवकुमार यांनी महिला उद्योजकांना राज्याच्या विकासात नेतृत्वाची भूमिका बजावण्याचे आवाहन केले. ते म्हणाले - महिला निर्मिती करतात. त्यांनी संसदेपर्यंत नेतृत्व सांभाळावे. सरकार पूर्ण सहकार्य करेल.

शिवकुमार म्हणाले की, ग्रामपंचायतींपासून संसदेपर्यंत महिलांचे नेतृत्व आवश्यक आहे. राज्य सरकार महिलांना सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे, असेही ते म्हणाले.

ते म्हणाले, "जेव्हा महिलांच्या सर्जनशीलता, क्षमता आणि दृढतेला भांडवल, तंत्रज्ञान आणि बाजारापर्यंत पोहोच मिळते, तेव्हा त्या काय निर्माण करू शकतात याला कोणतीही मर्यादा राहत नाही. त्यांची क्षमता पुढे वाढू शकेल असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची आहे."

मुख्यमंत्री म्हणाले की, त्यांना तरुण आणि महिलांच्या सामर्थ्यावर विश्वास आहे. त्यांनी सांगितले की, काँग्रेस सरकारने पाच हमी योजना सुरू केल्या आहेत. यामध्ये शक्ती, गृह लक्ष्मी, गृह ज्योती, अन्न भाग्य आणि युवा निधी यांचा समावेश आहे.

ते म्हणाले, "गृह लक्ष्मी योजनेअंतर्गत राज्यातील 1.22 कोटी महिलांना दरमहा 2,000 रुपये मिळतात. यामुळे त्यांना आपले कुटुंब सांभाळण्यास मदत झाली आहे."

शिवकुमार यांनी भारतीय संस्कृतीत महिलांना कुटुंबाचे "डोळे" म्हटले. त्यांनी व्यवसाय चालवताना आर्थिक आव्हानांना तोंड देणाऱ्या महिला उद्योजिकांचे कौतुक केले आणि त्यांना सरकारच्या पूर्ण पाठिंब्याचे आश्वासन दिले.

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचे उदाहरण देत ते म्हणाले की, सोनिया गांधींनी आपल्या सासू आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी तसेच आपले पती आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या मृत्यूसारख्या धक्क्यांचा सामना केला. या धक्क्यांनंतरही त्यांनी पुढे येऊन पक्षाचे नेतृत्व केले.

शिवकुमार यांनी महाभारतातील द्रौपदी आणि कुंतीचे उदाहरण देत सांगितले की, महिलांमध्ये खूप प्रतिभा आणि क्षमता आहे. त्यांनी महिलांना नेतृत्वाची भूमिका स्वीकारण्याचे आवाहन केले.

कर्नाटक सरकारमध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह एकूण 33 मंत्री आहेत. पण यात एकही महिला मंत्री समाविष्ट नाही. 3 ऑगस्ट 2026 रोजी डीके शिवकुमार यांनी 20 नवीन मंत्र्यांना समाविष्ट केले होते. पण या विस्तारातही कोणत्याही महिलेला स्थान मिळाले नाही.

## पत्नीचा खून, मुलावर हल्ला; फरार माजी सैनिकाचा मृतदेह सापडला





**पुणे :** जिल्ह्यातील राजगुरुनगर परिसरात घडलेल्या एका कौटुंबिक हत्याकांडाने संपूर्ण परिसर हादरला आहे. पत्नीचा गळा आवळून खून केल्यानंतर स्वतःच्या 17 वर्षीय मुलावरही जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप असलेला माजी सैनिक महेंद्र शिवाजी दौंडकर याचा मृतदेह बुधवारी सकाळी भीमा नदीकाठी आढळून आला. आरोपीने नदीकाठच्या एका झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. बहिणीशी पत्नी बोलत नसल्याच्या कारणावरून निर्माण झालेल्या वादातून ही संपूर्ण घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. पत्नीचा खून आणि मुलावर हल्ला केल्यानंतर महेंद्र दौंडकर फरार झाला होता. पोलीस त्याचा कसून शोध घेत असतानाच चांडोली गावाच्या हद्दीत त्याचा मृतदेह आढळून आल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

मयत महेंद्र शिवाजी दौंडकर (वय 45, रा. संगम गार्डन, वाडा रोड, राजगुरुनगर) हे माजी सैनिक होते. रविवारी, 30 ऑगस्ट रोजी रात्री त्यांच्या घरात हा प्रकार घडला. पत्नी दीपा महेंद्र दौंडकर (वय 40 ) या महेंद्रच्या बहिणीशी बोलत नसल्याच्या कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला होता. या वादातून संतप्त झालेल्या महेंद्रने पत्नी दीपाचा गळा आवळल्याचा आरोप आहे. या घटनेत दीपाचा मृत्यू झाला. घरातील वादाने काही वेळातच हिंसक वळण घेतल्याने दौंडकर कुटुंबावर मोठे संकट कोसळले.

दरम्यान, घरात घडलेल्या प्रकाराची माहिती महेंद्र आणि दीपा यांच्या 17 वर्षीय मुलाला नव्हती. अथर्व आईला उठवण्यासाठी बेडरूममध्ये गेला असता त्याला आईचा मृत्यू झाल्याचे लक्षात आले. मात्र, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर आरोपी महेंद्रने स्वतःच्या मुलावरही हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुलाचा ओढणीच्या साहाय्याने गळा आवळून त्याला मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुलाने आरडाओरडा करत प्रतिकार केल्यानंतर त्याच्यावर चाकूने वार करण्यात आल्याचीही माहिती पोलिसांच्या तपासातून समोर आली आहे. या हल्ल्यात जखमी झालेल्या अथर्वनेच या प्रकरणात फिर्याद दिली होती. पत्नीचा मृत्यू आणि मुलावर झालेल्या हल्ल्यामुळे राजगुरुनगर परिसरात मोठी चर्चा सुरू झाली होती. एका क्षुल्लक कौटुंबिक कारणावरून घरातील वाद इतका टोकाला जाईल, याची कोणालाही कल्पना नव्हती.

## महिलेला सरसंघचालक करणार का? पृथ्वीराज चव्हाणांचा सवाल



**नाशिक :** काँग्रेसने महिला आरक्षण विधेयकाला कधीही विरोध केलेला नाही, उलट काँग्रेसच महिला आरक्षणाची खरी जनक आहे, असा जोरदार पलटवार महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. नाशिकमध्ये काँग्रेसच्या 10 दिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या प्रसंगी माध्यमांशी बोलताना त्यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर (RSS) अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली. तसेच, राज्यातील पेपरफुटी, नाशिक कुंभमेळ्यातील संभाव्य भ्रष्टाचार आणि 1 लाख कोटींच्या शक्तिपीठ महामार्गातील कमिशनखोरीवरून त्यांनी महायुती सरकारवर गंभीर आरोप केले.

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नाशिक दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भाजप महिला मोर्चाने केलेल्या आंदोलनावर प्रत्युत्तर देताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, काँग्रेसने कधीही विरोध केला नाही: "काँग्रेसचा महिला आरक्षणाला विरोध आहे, हे कोणत्या मूर्खाने सांगितले? २०२३ मध्ये जेव्हा केंद्र सरकारने घटनादुरुस्ती विधेयक आणले, तेव्हा काँग्रेसने त्याला पूर्ण पाठिंबा दिला होता. महिला आरक्षणाचे मूळ जनक आम्हीच आहोत."

"भाजपला महिला आरक्षण लागू करायचे नसून केवळ उत्तर-दक्षिण वाद निर्माण करायचा आहे आणि जनगणनेच्या नावाखाली टोलवाटोलवी करायची आहे. महिलांच्या अधिकारांवर बोलणाऱ्यांनी आधी सांगावे की राष्ट्रीय स्वयंसेवक संघात (RSS) एखाद्या महिलेला प्रवेश मिळतो का? संघात एखादी महिला कधी 'सरसंघचालक' होऊ शकते का? मनुस्मृती मानणाऱ्यांनी आम्हाला महिलांचे हक्क शिकवू नयेत."

एमपीएससी (MPSC) औषध निरीक्षक परीक्षेतील गैरप्रकार आणि राज्यातील सातत्यपूर्ण पेपरफुटीवर चव्हाण यांनी तीव्र संताप व्यक्त केला. दोन-दोन कोटींना पेपर विक्री: "कॉलेज प्रवेश असो वा सरकारी नोकऱ्या, राज्यात प्रत्येक पेपर फुटत आहे. या पेपरफुटीच्या गोरखधंद्याला भाजपचे ज्येष्ठ नेते जबाबदार आहेत. पेपरफुटीमध्ये कोणतीही मोठी जोखीम राहिलेली नाही; कारण कोणालाही कडक शिक्षा होत नाही, मात्र बक्षीस प्रचंड मिळते. दोन-दोन कोटी रुपयांना एक-एक पेपर विकला जात आहे."

"भाजपच्या कार्यकाळात 150 हून अधिक परीक्षांचे पेपर फुटले, पण एकाही मोठ्या सूत्रधाराला शिक्षा झालेली नाही. गरीब विद्यार्थ्यांचे हे शोषण आम्ही खपवून घेणार नाही. सरकारने या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढून संबंधितांना कठोर शिक्षा केली पाहिजे."

नाशिकच्या पायाभूत सुविधा आणि विकासकामांवर बोलताना त्यांनी सरकारवर थेट भ्रष्टाचाराचे ताशेरे ओढले. कुंभमेळ्याचा डीपीआर नाही: "नाशिक खड्ड्यांचे शहर झाले आहे. नाशिक कुंभमेळ्याचा कोणताही सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) अद्याप तयार नाही. स्थानिकांना आणि जनतेला विश्वासात न घेता केवळ ठराविक ठेकेदारांना खिरापत वाटण्याचे काम सुरू आहे. कुंभमेळ्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू आहे."

"1 लाख कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग हा केवळ 40 टक्के कमिशन लाटण्यासाठी रेटला जात आहे. शेतकरी या प्रकल्पाला कडाडून विरोध करत आहेत आणि आगामी निवडणुकीत काँग्रेस हा भ्रष्टाचाराचा मुद्दा जनतेच्या न्यायालयात मांडणार आहे."

काँग्रेसच्या नवनिर्वाचित 70 ते 80 जिल्हाध्यक्षांच्या 10 दिवसीय निवासी शिबिराच्या समारोपासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी नाशिकमध्ये दाखल झाले. शिबिरात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यापूर्वी राहुल गांधी यांनी राज्यातील प्रमुख काँग्रेस नेत्यांची उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत राज्यातील शेतकऱ्यांच्या रोज होणाऱ्या आत्महत्या, शक्तिपीठ महामार्गाचा वाद, नाशिक कुंभमेळ्यातील आर्थिक गैरव्यवहार, मतदार याद्यांमधून वगळण्यात आलेली नावे आणि आदिवासी आश्रमशाळांमधील समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. सूत्रांच्या माहितीनुसार, नाशिक कुंभमेळ्यातील निधीचा अपव्यय आणि भ्रष्टाचाराचा मुद्दा राहुल गांधी संसदेत तसेच राष्ट्रीय पातळीवर आक्रमकपणे मांडणार आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ सप्टेंबर २०२६


## माजी विद्यार्थी संघटनेतर्फे प्रा. डॉ. राम कदम यांचा सत्कार



**गुंजोटी : (प्रा.नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात भौतिशास्त्र विभागात कार्यरत असलेले प्रा. डॉ. रामकृष्ण कदम यांना यावर्षीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने सुरू केलेल्या या पुरस्काराचा पहिलाच बहुमान भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ.राम कदम यांनी पटकावला. विद्यापीठाच्या 68 व्या वर्धापन दिनी कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर,यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या विशेष समारंभात प्रा. डॉ. रामकृष्ण कदम यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.गुंजोटी परिसरात त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. गुंजोटीसारख्या छोट्या पण सांस्कृतिक दृष्ट्या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या छोटेखानी शहरात डॉ. कदम यांना मानणारा खुप मोठा वर्ग आहे. अत्यंत मनमिळाऊ व मितभाषी स्वभावाचे म्हणून ते या परिसरात ओळखले जातात. गुंजोटीकरांसाठी हा आनंद, अभिमान गौरवाचा क्षण म्हणून श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या सतत क्रियाशील व कार्यशील असलेल्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे त्यांचा महाविद्यालयात हृदय सत्कार करण्यात आला.याप्रसंगी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड ,डॉ. रमेश पात्रे, डॉ महादेवजी खोत, डॉ. राजाराम निगडे, सेवानिवृत्त प्रा. बडोदकर, मा. श्याम देशमुख, श्री. रितेश गायकवाड, श्री.नागेश सूर्यवंशी, श्री.श्रेयश रेड्डी,श्री. ओमकार पाटील, श्री राज सूर्यवंशी, प्रियंका जाधव इत्यादी उपस्थित होते.

## नपा शाळेत भरविलेल्या चित्रप्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सिल्लोड :** नगरपरिषदेच्या शाळेत सर्पविज्ञान या विषयावर अंनिस कार्यकर्ते सुनिल चौथमल यांनी भरविलेल्या चित्रप्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सिल्लोड आणि प्रशालेच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी चित्रप्रदर्शन भरविण्यात आले. प्रशालेचे मुख्याध्यापक नारायण चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या प्रदर्शनास प्रमुख पाहुणे म्हणून अंनिसचे जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे, शाखा प्रधान सचिव नारायण फाळके, प्रकाश दौड आदी होते. चित्र प्रदर्शनात सापाच्या विविध जाती, त्यांच्या विषयी सामान्यांच्या मनात असलेल्या अंधश्रद्धा आदींविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकाचे निरसन करण्यात आले. राज रगडे, सचिन खरात, असद शेख, आलिया कुरेशी, अंजली खंडागळे, प्रिन्स छल्ले, अमान शेख आदी विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरात सहभाग नोंदविला. प्रा. शिवाजी वाठोरे, नारायण फाळके, यांनीही विचार मांडले. सूत्रसंचालन जयश्री देवरे यांनी तर जेबा बागवान यांनी आभार मानले. मनिषा जैस्वाल, आस्लम सय्यद, संजय राठोड, जावेद दळवी, सुनिल पावरा, जेबा बागवान, जोगेश्वरी पाटील आदींनी परिश्रम घेतले.

## परवाना नसलेल्या चायनीज हॉटेल्सवर सीलची कारवाई



**दौलताबाद (जावेद अहमद) :** अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत आवश्यक परवाना अथवा नोंदणी न घेता दौलताबाद बस स्थानक परिसरात अन्न व्यवसाय(बॉंबे चायनीज )सुरू असल्याचे अन्न औषधी विभागाच्या तपासणीत आढळून आल्याने संबंधित व्यावसायिकाला तात्काळ व्यवसाय बंद करण्याचे आदेश दि ०२ बुधवारी देण्यात आले आहेत.ही कार्यवाही छत्रपती संभाजीनगर येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ तसेच त्याअंतर्गत अन्न सुरक्षा व मानदे (अन्न व्यवसाय परवाना व नोंदणी) नियम, २०११ मधील तरतुदींनुसार अन्न व्यवसायासाठी आवश्यक परवाना अथवा नोंदणी घेणे बंधनकारक आहे. मात्र, मेसर्स बॉंबे चायनीज चे मालक या आस्थापनाची बुधवारी तपासणी करण्यात आली. त्यावेळी संबंधित व्यवसाय परवाना अथवा नोंदणीशिवाय सुरू असल्याचे निदर्शनास आल्याचे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.तसेच तपासणीदरम्यान कायद्यातील परिशिष्ट ४ मधील स्वच्छतेसंबंधी तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचेही आढळून आले. त्यामुळे मानवी जीवन व आरोग्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने संबंधित कायद्यातील तरतुदींनुसार वैध परवाना अथवा नोंदणी प्राप्त करेपर्यंत आणि तपासणीत नमूद स्वच्छतेच्या त्रुटींची पूर्तता करेपर्यंत व्यवसाय तात्काळ बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईप्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील कलम ५५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा नोटिशीत देण्यात आला आहे. अन्न व्यवसाय करणाऱ्या सर्व व्यावसायिकांनी नियमानुसार वैध परवाना अथवा नोंदणी घेऊनच व्यवसाय करावा आणि अन्न सुरक्षेशी संबंधित स्वच्छता व इतर आवश्यक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.ही कारवाई होत असल्याचे पाहून दौलताबाद ,अब्दीमंडी,माळीवाडा येथील लहान मोठे व्यवसायिकांनी धसका घेत दुकाने, हॉटेल,टपरी बंद करून घेतली होती




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ सप्टेंबर २०२६


## यशाचे गमक

सौजन्य बाळगता,
सुख शांती मिळते.
जीवनातले दारिद्र्य,
कोसो दूर दूर पळते. 1

सौजन्याने वागतांना,
दु:ख दूर पळतात.
स्वत:ची प्रगती करता,
शत्रू सदैव जळतात. 2

सौजन्याने शांतता,
खूप वाढीस लागते.
प्रत्येकाच्या मनात,
नाते प्रेमाचे जागते. 3

सौजन्य दाखवून सदा,
शत्रूलाही माफ करावे.
सुख शांती आनंदाने,
जीवनात सप्तरंग भरावे. 4

सौजन्य, सुख, शांती,
आहेत यशाचे गमक.
सौजन्य बाळगायला,
पाहिजे हृदयात धमक. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी बीडच्या विकासाला नवी गती; १७ सप्टेंबरला रेल्वेची पुण्याशी तर डिसेंबरमध्ये मुंबईशी जोडणी



**मुंबई, बीड (भगवंत पाळवदे) :** बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी 'बीड–पुणे' रेल्वे येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर धावणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक व सुरक्षाविषयक चाचण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच डिसेंबरअखेर बीड–मुंबई (पनवेल) रेल्वे सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व कामे युद्ध पातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिल्या.सह्याद्री अतिथीगृह येथे 'अहिल्यानगर–बीड–परळी' रेल्वे मार्गाच्या प्रगतीचा आढावा तसेच 'बीड–पुणे' आणि 'बीड–मुंबई' रेल्वे सेवा सुरू करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मध्य रेल्वेचे मुख्य अभियंता (निर्माण) बी. के. सिंह, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, वरिष्ठ विभागीय अभियंता व्ही. पी. पैठणकर, सीसीएम डॉ. सुमंत देऊळकर, विल्यम केरी यांच्यासह रेल्वे व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बीडसह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी गती देणाऱ्या 'बीड–पुणे' आणि 'बीड–मुंबई' रेल्वे सेवेसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे 'अहिल्यानगर–बीड–परळी' या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाला गती मिळाली. गतवर्षी बीडकरांची ४० वर्षांची प्रतीक्षा संपवून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी (१७ सप्टेंबर २०२५ रोजी) 'बीड ते अहिल्यानगर' रेल्वे सेवा प्रत्यक्ष सुरू झाली आणि आता यावर्षी त्याच ऐतिहासिक दिनी 'बीड–पुणे' रेल्वे सेवा सुरू होत आहे.'बीड–पुणे' रेल्वे सुरू झाल्यानंतर जिल्ह्याची पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राशी थेट व अधिक सक्षम रेल्वे जोडणी निर्माण होणार आहे. यामुळे बीडच्या कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक आणि व्यापार क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून नागरिकांच्या प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होण्यासही मदत होणार आहे. बीडच्या आर्थिक विकासासाठी हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सूचना देताना सांगितले की, १७ सप्टेंबर रोजी 'बीड–पुणे' रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी उर्वरित सर्व तांत्रिक, प्रशासकीय व सुरक्षाविषयक प्रक्रिया वेळेत पूर्ण कराव्यात. त्याचबरोबर डिसेंबरअखेर 'बीड–मुंबई' रेल्वे सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवून आवश्यक कामांचा कालबद्ध आराखडा तयार करून सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत.

येत्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या 'बीड–पुणे' रेल्वे सेवेच्या ऐतिहासिक शुभारंभ कार्यक्रमाची सर्व तयारी अत्यंत नियोजनबद्ध, प्रभावी आणि समन्वयाने करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.'बीड–पुणे' आणि पुढे 'बीड–मुंबई' ही केवळ रेल्वे सेवा नसून बीडच्या विकासाला जोडणारी नवी जीवनवाहिनी आहे. दिवंगत अजितदादांनी पाहिलेल्या विकसित बीडच्या स्वप्नपूर्तीसाठी या रेल्वे जोडणीची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी नमूद केले

# मराठी साहित्यातील पहिले ज्ञानपीठ विजेते साहित्यिक - वि. स. खांडेकर



दि.२ सप्टेंबर १९७६ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला, पण त्यांनी निर्माण केलेले साहित्य आजही तितक्याच तेजाने तळपत आहे. वाचकांसाठी मौल्यवान आहे.विष्णू सखाराम खांडेकर यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगली येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना वाचन, लेखन आणि अभिनयाची प्रचंड आवड होती. त्यांचे शिक्षण सांगलीतच झाले. १९२० साली ते कोकणातील शिरोडा, सध्याचा सिंधुदुर्ग जिल्हा, येथील एका शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. १९३८ पर्यंत म्हणजे तब्बल १८ वर्षे त्यांनी ही नोकरी अत्यंत निष्ठेने केली. शिक्षकी पेशाने त्यांच्या व्यक्तित्वाला दोन मोठे आयाम दिले. एक म्हणजे जीवनाकडे बघण्याची संवेदनशील दृष्टी आणि दुसरे म्हणजे विद्यार्थ्यांशी बोलताना भाषेवर असलेले प्रभुत्व. वर्गात शिकवता शिकवता, निसर्गाच्या सान्निध्यात राहत त्यांनी आपली लेखणी सतत तेवत ठेवली. ते केवळ लेखक नव्हते, तर एक चिंतक, तत्वज्ञ आणि अत्यंत हळव्या मनाचा माणूस होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण विरोधाभास होता, ते स्वभावाने अत्यंत शांत, मितभाषी पण लेखणीतून मात्र प्रचंड विद्रोही, भावनाप्रधान आणि कल्पनेच्या भराऱ्या घेणारे होते.खांडेकरांच्या लेखनाचा आवाका पाहिला तर थक्क व्हायला होते. त्यांनी साहित्याच्या जवळपास सर्वच प्रकारात लेखन केले. १६ कादंबऱ्या ,६ नाटके, सुमारे २५० लघुकथा, आणि ५० दीर्घकथा ललित निबंध आणि समीक्षा १०० हून अधिक निबंध आणि २०० समीक्षात्मक लेखत्यांच्या 'कांचनमृग (१९३१), 'हृदयाची हाक, 'उल्का (१९३४), 'दोन मने, 'हिरवा चाफा', 'अमृतवेल', 'क्रौंचवध', 'जळलेला मोहोर', 'पांढरे ढग' या कादंबऱ्यांनी मराठी वाचकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. खांडेकरांचे साहित्य हे केवळ कथा सांगत नाही, तर जीवनाचे तत्वज्ञान सांगते. त्यांच्या प्रत्येक कादंबरीत एक नैतिक संघर्ष असतो. चांगले आणि वाईट, आदर्श आणि वास्तव, स्वार्थ आणि त्याग यांच्यातील द्वंद्व ते अत्यंत प्रभावीपणे मांडतात. त्यांचे नायक कधी पराभूत होतात, पण तरीही त्यांच्या पराभवातही एक उदात्तता असते.वि. स. खांडेकर म्हटले की डोळ्यासमोर येते ती 'ययाति'. १९५९ साली प्रकाशित झालेली ही कादंबरी मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड आहे. महाभारतातील 'ययाति' राजाची पौराणिक कथा घेऊन खांडेकरांनी तिला आधुनिक मानवी मनाचे रूप दिले.ययाति ही केवळ एका राजाची कामलोलुपतेची गोष्ट नाही, तर ती प्रत्येक माणसाच्या आत असलेल्या अमर्याद इच्छा, अतृप्त वासना आणि त्या वासनेतून निर्माण होणाऱ्या दुःखाची कथा आहे. कच, देवयानी, शर्मिष्ठा, ययाति या पात्रांच्या माध्यमातून त्यांनी प्रेम, सूड, अहंकार, आणि पश्चातापाचे अत्यंत गुंतागुंतीचे दर्शन घडवले आहे.कादंबरीची भाषा शैली ही सर्वात मोठा दागिना आहे. त्यांची वाक्यरचना कधी कधी अर्धा ते पाऊण पान व्यापते, पण तरीही वाचकाला त्याचा कंटाळा येत नाही. उलट, त्या ओघवत्या, अलंकारिक पण सहज भाषेत वाचक वाहत जातो. याचे कारण त्यांची दांडगी प्रतिभाशक्ती आणि अफाट शब्दसंपत्ती. अनेक समकालीन लेखक आत्मचरित्र लिहिण्यातच अडकतात कारण त्यांच्याकडे कल्पनेची झेप नसते, पण खांडेकरांकडे कल्पना आणि शब्द दोन्ही अखंड होते.खांडेकर हे केवळ पुस्तकी लेखक नव्हते, त्यांचे साहित्य पडद्यावरही तितकेच जिवंत झाले. त्यांच्या कथांवर अनेक चित्रपट आणि दूरदर्शन मालिका बनल्या.१९३६ साली 'छाया' हा मराठी चित्रपट, १९३८ साली 'ज्वाला' हा हिंदी-मराठी द्विभाषिक चित्रपट, १९४१ साली 'अमृत' आणि त्याच वर्षी 'धर्मपत्नी' हा तमिळ आणि तेलगू भाषेत चित्रपट झाला. 'परदेशी', 'देवता' हेही त्यांच्याच साहित्यकृतींवर आधारित चित्रपट. विशेष म्हणजे १९४० साली गाजलेल्या 'लग्न पहावे करून' या मराठी चित्रपटाचे संवाद आणि पटकथा त्यांनीच लिहिली होती. यावरून त्यांच्या लेखणीची लोकप्रियता आणि व्यावसायिक सिनेमातही असलेली पकड दिसून येते.त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव अनेक राष्ट्रीय पुरस्कारांनी झाला. १९६८ साली भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले.१९७४ साली त्यांना साहित्य अकादमीची फेलोशिप मिळाली.१९७४ हेच वर्ष त्यांच्यासाठी सुवर्णवर्ष ठरले. त्यांच्या `ययाति' कादंबरीला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. मराठी भाषेला मिळालेला हा पहिलाच ज्ञानपीठ पुरस्कार होता आणि तो खांडेकरांमुळेच मराठीच्या शिरपेचात रोवला गेला.त्यांच्या सन्मानार्थ भारतीय टपाल विभागाने त्यांचे टपाल तिकीटही काढले. वि.स.खांडेकर आपल्याला शिकवतात की जीवनात सौंदर्य आहे, पण त्या सौंदर्यासोबतच वेदना आहे. चांगुलपणाचा जयघोष करून ते वास्तवापासून पळत नाहीत, तर वाईटातूनही चांगले कसे शोधायचे याचा मार्ग दाखवतात. त्यांची भाषा शैली आजच्या पिढीला कदाचित थोडी अलंकारिक वाटेल, पण एकदा त्या भाषेच्या प्रेमात पडलो की दुसरे कोणतेही लेखन फिके वाटू लागते.अशा या महान लेखकाला शतशः नमन.

**~ प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे**
**जे ई एस महाविद्यालय जालना.**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ सप्टेंबर २०२६


## प्राचार्य डॉ. विजय भोसले यांना महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' जाहीर



**कन्नड :** ग्रामीण उच्च शिक्षणाच्या विकासासाठी शैक्षणिक, प्रशासकीय, पर्यावरणीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कन्नडचे प्राचार्य डॉ. विजय नानासाहेब भोसले यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सन २०२४-२५ चा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' जाहीर झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून प्राचार्य संवर्गात त्यांची निवड झाली असून, कन्नडच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी हा मानाचा बहुमान व सन्मान ठरला आहे. शासनाने २ सप्टेंबर, २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राचार्य व शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. प्राचार्य डॉ. विजय भोसले सर यांनी १९९४ मध्ये रसायनशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कारकिर्दीस सुरुवात केली असून, २००५ पासून ते महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने ई-लर्निंग, डिजिटल क्लासरूम, संगणक प्रयोगशाळा व करिअर मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम व विद्यार्थी विकासालाही त्यांनी चालना दिली.त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाचा 'श्री. छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्यस्तरीय पुरस्कार', 'जागर जाणीवांचा महिला सबलीकरण पुरस्कार' आणि विद्यापीठाचा 'आदर्श परीक्षा केंद्र पुरस्कार' मिळाला आहे. विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात गेल्या १० वर्षांपासून 'सर्वोत्कृष्ट ग्रामीण संघ' म्हणून महाविद्यालयाने सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे.पर्यावरण संवर्धनासाठी गेल्या २५ वर्षांपासून वृक्षलागवड करून महाविद्यालय परिसर 'ऑक्सिजन पार्क' म्हणून विकसित करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच ग्रामीण समाज व शेतकऱ्यांसाठी 'कृषी मंच' आणि 'माती परीक्षण प्रयोगशाळा' सुरू करण्यात आली. या कार्यातून शिक्षणसंस्थेला स्थानिक समाजाच्या विकासाशी जोडण्याचा प्रयत्न झाला. विद्यापीठीन पातळीवरही प्राचार्य डॉ. विजय भोसले सर यांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या असून कलम ३२(६) ए समितीचे अध्यक्ष, BCUD सदस्य, रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. तसेच नांदेड व अमरावती विद्यापीठांच्या प्राचार्य निवड समित्यांवरही त्यांनी योगदान दिले आहे. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना 'कन्नड भूषण', 'समाजभूषण', 'प्रशासकीय वाटसरू', 'आदर्श शिक्षक' 'आदर्श प्राचार्य शिक्षक सन्मान पुरस्कार-२०२६' डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात अंतर्गत 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार- २०२६ ', 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय - २०२४' आदी पुरस्कारांनीही गौरविण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार पुरस्कारार्थींना रु. २५ हजार रोख, शाल, श्रीफळ आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. प्राचार्य डॉ. विजय भोसले सरांची निवड ही त्यांच्या दीर्घ शैक्षणिक कार्यासोबतच ग्रामीण उच्च शिक्षण, पर्यावरण संवर्धन, विद्यार्थ्याभिमुख, समाजाभिमुख शिक्षणाच्या प्रयत्नांना मिळालेली महाराष्ट्र सरकारची राज्यस्तरीय मान्यता व येतोचित सन्मानाची सार्थ पावती आहे. त्यांच्या निवडीचे कन्नड व जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातून स्वागत होत असून संस्थेचे मार्गदर्शक मा.श्री. मानसिंहजी पवार (बापूसाहेब), संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती संजीवनी मानसिंह पवार, उपाध्यक्ष श्री. कृष्णा पाटील निकम, सचिव श्री. चंद्रकांतराव देशमुख, कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब मोहिते, ज्येष्ठ संचालक डॉ. पी. के. निकम,कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के. महाले, संस्थेचे संचालक श्री. लक्ष्मणराव देशमुख (आप्पासाहेब), श्री. विशाल आहेर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक, उपप्राचार्य डॉ.बी.के. मगर, प्रा. अभय आहेर तसेच फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर, संस्थेतील सर्व शाळा, महाविद्यालय व विभागाकडून शिक्षक, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांच्याकडून सरांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## परिस्थितीवर मात करत सामान्य दुकानदाराचा मुलगा होणार डॉक्टर



**कन्नड (अरुण थोरात) :** जिद्द, मेहनत आणि स्वअभ्यासाच्या बळावर घाटशेंद्रा ता.कन्नड येथील सय्यद एहसान नौशाद अली या युवकाने वैद्यकीय शिक्षण (एमबीबीएस) कडे यशस्वी वाटचाल केली आहे. मोठी स्वप्ने पाहून ती प्रत्यक्षात साकार करण्याची जिद्द असेल, तर परिस्थिती कितीही कठीण असली तरी यशाचा मार्ग नक्कीच सापडतो, हे घाटशेंद्रा येथील सय्यद एहसान नौशाद अली या युवकाने सिद्ध करून दाखवले आहे. एका सामान्य दुकानदाराच्या कुटुंबात वाढलेल्या एहसान यांनी आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, अहोरात्र मेहनत आणि स्वअभ्यासाच्या बळावर एमबीबीएस प्रवेशासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संभाजीनगर येथे आपले स्थान निश्चित केले आहे. त्याच्या या यशामुळे केवळ त्याचे कुटुंबच नव्हे, तर संपूर्ण घाटशेंद्रा गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.सय्यद एहसान नौशाद अली यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, घाटशेंद्रा येथे इयत्ता सातवीपर्यंत झाले. त्यानंतर त्यांनी इयत्ता आठवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण शिवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी अंतुर येथे पूर्ण केले. विशेष म्हणजे, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी एहसानने कोणत्याही महागड्या क्लासेसचा आधार घेतला नाही. घरच्या परिस्थितीची जाणीव ठेवून त्यांनी मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून घरी बसून स्वतः अभ्यास केला. उपलब्ध असलेल्या मर्यादित साधनांचा योग्य वापर करून, सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि प्रचंड आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने हे उल्लेखनीय यश संपादन केले. अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांतील कोचिंग क्लासेस, महागडी पुस्तके आणि विशेष सुविधा आवश्यक वाटतात. मात्र, जिद्द आणि योग्य दिशेने केलेला सातत्यपूर्ण प्रयत्न असेल तर मर्यादित साधनांमधूनही मोठे यश मिळवता येते, याचा आदर्श एहसानने सर्वांसमोर ठेवला आहे.एका छोट्याशा गावातील सामान्य दुकानदाराचा मुलगा आज डॉक्टर होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करत आहे. त्याचा हा प्रवास अनेक ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या सामान्य परिस्थितीतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे."परिस्थिती कितीही कठीण असली, साधने कितीही कमी असली तरी स्वप्न मोठे असावे आणि ते पूर्ण करण्याची जिद्द त्याहून मोठी असावी" हा संदेश सय्यद एहसान यांच्या यशातून मिळतो. घाटशेंद्रा गावातील या होतकरू विद्यार्थ्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत असून, त्याच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट
स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103